**मुखपृष्ठ कथा**

# माकपचा पराभव – राजकारणातली गडबड!


## सुहास पळशीकर

पुणे
दू. ०२० २ ५६९ ०८१५ (का.)
इमेल : suhaspalshikar@gmail.com






आजघडीला सर्व भारतभरात राजकीयदृष्ट्या सर्वाधिक कुतुहलाचे राज्य जर कोणते असेल तर ते पश्चिम बंगाल होय. सलग सहा वेळा निवडून येण्याचा विक्रम बंगालच्या डाव्या आघाडीने केला असून त्यामुळेच या आघाडीत व तिच्या सरकारमध्ये एक साचलेपणा-स्थितीवाद निर्माण झाला आहे. देशात जेव्हा कोणत्याही सरकारला पुन्हा निवडून येणं अवघड बनत होतं त्या काळातही कम्युनिस्ट नेतृत्वाखालचं राज्य सरकार प. बंगालमध्ये भरपूर मताधिक्याने निवडून येत राहिलं. या पार्श्वभूमीवर जून महिन्यात नगरपालिकांच्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसची सरशी झाली तेव्हापासून जणू काही बंगालमध्ये क्रांतीची पहाट होण्याची चाहूल लागल्याप्रमाणे चर्चा सुरू झाल्या आहेत. विशेषतः देशभरातली माध्यमे या स्थानिक निवडणुकांचे अतिशयोक्त अर्थ काढण्यात मग्न झालेली गेल्या काही दिवसात दिसली. पुढच्या वर्षी बंगाल विधानसभेच्या निवडणुका होतील आणि त्यावेळी डाव्या आघाडीचा पराभव होईल अशी भाकिते केली जाऊ लागली आहेत. या सर्वांच्या मागे कम्युनिस्ट विरोधाची भूमिकाच जास्त प्रभावी असून खुद्द प. बंगाल किंवा एकूण देशाच्या राजकारणाच्या संदर्भात कम्युनिस्ट पक्ष व डाव्या आघाडीचं सरकार यांचं काय स्थान आहे याची चर्चा करण्यात फारसा कोणालाच रस दिसत नाही.

### पक्षीय स्पर्धेची चौकट

पश्चिम बंगालमध्ये डाव्या आघाडीची लोकप्रियता कमी होते आहे याचा पुरावा म्हणून आत्ता झालेल्या नगरपालिका निवडणुकांकडे बघितले जाते आहे. वास्तविक २००९ च्या लोकसभा निवडणुकांमध्येच ही गोष्ट पुरेशी स्पष्ट झाली होती. २००४ च्या ५०.८% मतांच्या तुलनेत २००९ मध्ये डाव्या

आघाडीची मतांची टक्केवारी ४३.३% एवढी खाली घसरली. त्यामुळे आता अचानक नव्याने काही घडलं आहे अशातला भाग नाही. शिवाय या निवडणुका फक्त शहरी स्थानिक शासनाच्या होत्या. म्हणजे हा कल काही साऱ्या पश्चिम बंगालचा मानायचं कारण नाही. (डाव्या आघाडीला उतरती कळा लागली आहे हे खरं, पण तरीही त्यामुळे गैरलागू किंवा चुकीचा युक्तिवाद करण्याचं समर्थन होऊ शकत नाही; म्हणून प्रस्तुत मुद्याची नोंद आवश्यक आहे.)

शिवाय शहरी भागात डाव्या आघाडीला सरसकट पहिल्यांदाच धक्का बसला आहे असंही म्हणता येणार नाही. कोलकत्यात ममता बॅनर्जींनी पाय रोवले त्याला आता काही काळ लोटला आहे. पण एकूणही बंगालमध्ये गेल्या काही निवडणुकांमध्ये डाव्या आघाडीच्या सामाजिक आधारांची उलथापालथ चालू असून शहरी भागात त्यांना पीछेहाटीला तोंड द्यावं लागत आहे.

शिवाय, गेली सुमारे दहा वर्षे किंवा त्याहून थोडा जास्त काळ डाव्या आघाडीला विरोधकांमधल्या (म्हणजे मुख्यतः काँग्रेसमधल्या) फुटीचा फायदा मिळाला आहे. विविध कारणांमुळे ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस पक्ष सोडला. त्यात अर्थातच एक मुख्य कारण हे होतं की बंगालमधला प्रदेश काँग्रेस पक्ष ठामपणे कम्युनिस्ट विरोधात उभा राहात नाही अशी त्यांची तक्रार होती. तृणमूल काँग्रेसची स्थापना आणि प. बंगालमध्ये विस्तार करण्याचे भाजपचे प्रयत्न यामुळे डाव्या आघाडीचे विरोधक तीन गटांमध्ये विभागले गेले होते. त्यावर उपाय म्हणून ममतादीदींनी भाजपशी हातमिळवणी तर केलीच पण एका टप्प्यावर 'महाजोट' म्हणजे बडी आघाडी करून डाव्या आघाडीच्या सर्व विरोधकांना एकत्र आणण्याचेही प्रयत्न केले. ते अर्थातच फसले आणि त्यानंतर हळूहळू ममता बॅनर्जींनी भाजपपासून दूर राहायला सुरुवात केली व सरतेशेवटी २००९ मध्ये काँग्रेसशी हातमिळवणी केली.

म्हणजे फक्त पक्षीय स्पर्धेच्या भाषेत विचार केला तर काय दिसतं ?

स्वतःची पुरेशी ताकद असूनही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने (माकप) बंगालमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) आणि फॉर्वर्ड ब्लॉक व रेव्होल्युशनरी सोशॅलिस्ट पार्टी वगैरेंबरोबर दीर्घकाळ आपली युती कायम ठेवली. त्यामुळे डाव्या आघाडीकडे नेहमीच निवडणुका जिंकण्याच्या गरजेपेक्षा जास्तीचे राजकीय बळ राहिले. त्याउलट, गेल्या दशकभरात तिथे कम्युनिस्ट विरोधी पक्षांमध्ये मात्र एकवाक्यता होऊ शकली नाही आणि तृणमूल भाजप ही युती डाव्या आघाडीला आव्हान देऊ शकली नाही. काँग्रेस आणि तृणमूल हेच डाव्या आघाडीचे खरे मातब्बर प्रतिस्पर्धी आहेत. ते एकत्र आल्यावर स्वतः काँग्रेस पक्षाची मतं जरी वाढली नाहीत तरी तृणमूल काँग्रेसची मतं २००४ च्या तुलनेत तब्बल दहा टक्क्यांनी वाढली. २००९ च्या या आकडेवारीवरून एक थोडा अतिशयोक्त निष्कर्ष असा काढला गेला की डाव्या आघाडीची लोकप्रियता फारच खालावली आहे. प्रत्यक्षात असं मानायला जागा आहे की तृणमूल काँग्रेस भाजपबरोबर असल्यामुळे त्याला मत न देणारे समूह २००९ मध्ये त्यांच्याकडे वळले. उदाहरणार्थ, मुस्लिम मतदान. काँग्रेस व तृणमूल यांना २००४ मध्ये स्वतंत्रपणे जेवढी मुस्लिम मतं मिळाली त्यापेक्षा २००९ मध्ये एकत्रितपणे त्यांना तब्बल १४% जास्त मुस्लिम मतं मिळाली, असं राष्ट्रीय निवडणूक सर्वेक्षणांमधून दिसतं.

याचा अर्थ असा की आघाडीच्या राजकारणाचा एक नवा टप्पा प. बंगालमध्ये सुरू झाला आहे. पहिल्या टप्प्यात आघाडीचं राजकारण करून डाव्या आघाडीने आपलं वर्चस्व उभं केलं. दुसऱ्या अगदी संक्षिप्त टप्प्यात तृणमूल-भाजपच्या आघाडीला स्पर्धात्मक यश मिळवता आलं नाही. आता काँग्रेस-तृणमूल आघाडीपाशी किमान कम्युनिस्टांपुढे आव्हान उभं करण्याची आणि त्यासाठी लागणारी सामाजिक उलथापालथ घडवण्याची क्षमता दिसते आहे.

### डाव्या आघाडीच्या मर्यादा

अर्थात केवळ पक्षीय स्पर्धेच्या आकृतिबंधातून सगळं राजकारण घडत/बदलत नाही. त्याच्याबरोबरीने इतर अनेक

घटक त्या-त्या आघाडीच्या यशापयशात भागीदार असतात. त्यामुळे निव्वळ या नव्या आघाडीमुळे डावी आघाडी पराभवाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे असं मानणं फसवं ठरेल. तीन दशकं सत्तेवर असलेल्या डाव्या आघाडीच्या उतरत्या कळेला तिचं स्वतःचं 'कर्तृत्व'ही कारणीभूत आहेच.

कितीही लोकाभिमुख पक्ष असला तरी तीन दशकांएवढा प्रदीर्घ काळ सत्तेवर राहिल्यामुळे त्याच्या लोकाभिमुखतेला ओहोटी लागू शकते. हे जसे काँग्रेससारख्या मध्यममार्गी पक्षाबद्दल खरे आहे तसेच कम्युनिस्ट पक्षासारख्या क्रांतिकारी पक्षाच्या बाबतीतही लागू आहे. त्यामुळे प. बंगालमधल्या डाव्या आघाडीच्या आणि तिचं नेतृत्व करणाऱ्या माकपच्या मूल्यमापनाची नितांत आवश्यकता आहे.

पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर आल्यानंतर डाव्या आघाडीने जमीनसुधारणांचा मोठा कार्यक्रम राबवून ग्रामीण भागात आपला पाठिराखा वर्ग तयार केला. या कार्यक्रमात मर्यादा असल्याची टीका नंतरच्या काळात केली गेली तरीही बंगालच्या जमीन सुधारणा आणि जमीन वाटप कार्यक्रमाचं महत्त्व कमी होत नाही. मात्र भांडवलशाहीविरोधी भूमिकेमुळे राज्याच्या औद्योगिकीकरणाबद्दल डावी आघाडी ठाम भूमिका घेऊ शकली नाही. यातून आर्थिक स्थिती बिकट होत आहे हे लक्षात आल्यानंतर निवडक औद्योगिकरणाला सुरुवात झाली. देशाची एकूण औद्योगिक धोरणं पूर्णपणे धुडकावून लावून एकाच राज्यात वेगळी औद्योगिक धोरणं कशी आखता/राबवता येतील हा डाव्यांपुढचा पेच होता. एकेकाळी रशियालाही कम्युनिस्ट क्रांतीनंतर याच पेचाला आंतरराष्ट्रीय संदर्भात सामोरं जावं लागलं होतं. इथे तर एकाच राज्यव्यवस्थेच्या अंतर्गत आणि मर्यादित अधिकार असलेल्या एका घटकराज्याचा प्रश्न होता. त्यावरचा एक उपाय म्हणून डाव्या आघाडीने आपल्या पहिल्या दशकभरात राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेच्या मुद्याचा पाठपुरावा केला खरा, पण त्याला कोणाची फारशी साथ मिळण्याची शक्यता नव्हतीच. त्यानंतर डाव्या आघाडीला बंगालमध्ये औद्योगिक विस्तारासाठी धोरणात्मक प्रयत्न करणे भाग पडले. त्यापुढच्या टप्प्यावर उदारीकरणाला आरंभ झाला आणि कम्युनिस्ट पक्षाची धोरणे आणि डाव्या आघाडीच्या सरकारचे कार्यक्रम यांच्यातला विसंवाद आणखी प्रकर्षाने पुढे आला.

अर्थात, यावर राष्ट्रीय नेतृत्वाने मार्ग काढायला हवा होता. इ. स. २००० नंतरच्या पक्षाच्या धोरणविषयक भूमिकेत यासाठीचे प्रयत्न झालेले दिसतात सुद्धा. पण बंगालपुरते बोलायचे तर डाव्या आघाडीने तयार केलेली राजकीय मानसिकता आणि उदारीकरणाच्या चौकटीत स्वीकारलेली धोरणे यांचा मेळ बसला नाही. यातून दोन गोष्टी घडल्या. एक तर पक्ष कार्यकर्त्यांना स्पष्ट धोरणात्मक भूमिका कळणे अवघड होऊन बसले व त्यामुळे पक्षाचे वैचारिक स्वरूप मागे पडून सत्ता राबवणारी यंत्रणा हेच स्वरूप प्रकर्षाने शिल्लक राहिले. दुसरा परिणाम म्हणजे वर्गीय हितसंबंधांच्या चौकटीत पक्ष/डावी आघाडी ज्या हितसंबंधांशी राजकीयदृष्ट्या जोडून घेत होती त्यांचे आर्थिक हितरक्षण करणे सरकारला अवघड

■■

**एखादा परिवर्तनवादी आणि जनसमूहाभिमुख पक्ष सत्तेवर आल्यावर आपला कारभार जनहिताच्या दिशेने वळवू शकत नाही का? असा एक प्रश्न यातून उभा राहतो. दुसरा प्रश्न निर्माण होतो तो असा की परिवर्तनवादी पक्षाचे सरकार प्रस्थापित, उदारमतवादी लोकशाहीच्या चौकटीत फार काही करू शकत नाही का ? की ज्या पद्धतीने कम्युनिस्ट पक्षाने सरकारी सत्ता राबवली त्यात या विसंगतींची बीजं आहेत ?**

■■

होत गेले. यातून सरकारविरोधात असंतोष साचत जायला हातभार लागला.

मात्र या सगळ्या गुंतागुंतीला केंद्र सरकारची धोरणे आणि कम्युनिस्टांच्या केंद्रीय नेतृत्वाचं अपयश जबाबदार आहे असं म्हटलं तरीही सत्तारूढ पक्ष म्हणून डाव्या आघाडीचं सगळं अपयश काही झाकलं जात नाही आणि प. बंगालच्या सरकारच्या पुढचा खरा प्रश्न तोच आहे. उदाहरणार्थ, प. बंगालमधल्या आदिवासी, दलित व मुस्लिमांची परिस्थिती वाईट का आहे याचं उत्तर डाव्या आघाडीच्या शासनव्यवहारातच शोधावं लागतं. 'ऑपरेशन बरगा' सारख्या लोकाभिमुख मोहिमेनंतर राज्यकारभार करताना मागासलेले प्रदेश (उत्तर बंगाल) व पिछडे समूह यांच्या हितासाठी निव्वळ उदारमतवादी लोकशाही चौकटीत तरी डाव्या आघाडीने पुरेसे प्रयत्न का केले नाहीत हा खरा प्रश्न आहे.

एखादा परिवर्तनवादी आणि जनसमूहाभिमुख पक्ष सत्तेवर आल्यावर आपला कारभार जनहिताच्या दिशेने वळवू शकत नाही का? असा एक प्रश्न यातून उभा राहतो. दुसरा प्रश्न निर्माण होतो तो असा की परिवर्तनवादी पक्षाचे सरकार प्रस्थापित, उदारमतवादी लोकशाहीच्या चौकटीत फार काही करू शकत नाही का ? की ज्या पद्धतीने कम्युनिस्ट पक्षाने सरकारी सत्ता राबवली त्यात या विसंगतींची बीजं आहेत ?

■■

**क्रांतिकारक परिवर्तनाच्या आग्रहातून प. बंगालमध्ये पक्षाने सामाजिक व्यवहारांचे नियंत्रण (पक्ष कार्यकर्त्यांमार्फत) करण्यावर भर दिला. त्यामुळे संपूर्ण सार्वजनिक व्यवहार क्षेत्र हे पक्षनियंत्रित बनून प्रत्येक अपयश, प्रत्येक विपर्यास, प्रत्येक विरोधाभास यांची जबाबदारी पक्षावर येऊन पडली. राज्यशासनाखेरीजच्या सार्वजनिक क्षेत्राच्या पक्षीय नियंत्रणामागे असणाऱ्या प्रखर स्टॅलिनवादी भूमिकेमुळे हे झाले की आपल्या कार्यकर्त्यांच्या विस्तृत जाळ्याला कोणत्या-ना-कोणत्या स्वरूपात सत्ताव्यवहाराशी जोडून घेण्याच्या राजकीय प्रेरणेतून हे घडले याचा निर्णय करणे अवघड आहे.**

■■

### पक्ष आणि सरकार यांची सरमिसळ

प. बंगालमधल्या माकपवरचा एक महत्त्वाचा आक्षेप असा आहे की पक्षयंत्रणेकडे सरकारी सत्तेचं नियंत्रण असून सरकारच्या पलीकडच्या स्वायत्त सार्वजनिक क्षेत्रावरही तिथे पक्षाने कब्जा केला आहे. क्रांतिकारक परिवर्तनाच्या आग्रहातून प. बंगालमध्ये पक्षाने सामाजिक व्यवहारांचे नियंत्रण (पक्ष कार्यकर्त्यांमार्फत) करण्यावर भर दिला. त्यामुळे संपूर्ण सार्वजनिक व्यवहार क्षेत्र हे पक्षनियंत्रित बनून प्रत्येक अपयश, प्रत्येक विपर्यास, प्रत्येक विरोधाभास यांची जबाबदारी पक्षावर येऊन पडली. राज्यशासनाखेरीजच्या सार्वजनिक क्षेत्राच्या पक्षीय नियंत्रणामागे असणाऱ्या प्रखर स्टॅलिनवादी भूमिकेमुळे हे झाले की आपल्या कार्यकर्त्यांच्या विस्तृत जाळ्याला कोणत्या-ना-कोणत्या स्वरूपात सत्ताव्यवहाराशी जोडून घेण्याच्या (उदारमतवादी लोकशाही) राजकीय प्रेरणेतून हे घडले याचा निर्णय करणे अवघड आहे. पण त्यातून पक्ष सर्वव्यापी बनला आणि सर्व अपयशांचा/अतिरेकांचा धनी बनला.

गेल्या दोनेक वर्षांत डाव्या आघाडीच्या सरकारपुढचे प्रेचप्रसंग नंदीग्राम, सिंगूर आणि लालगड या तीन उदाहरणांच्या रूपाने व्यक्त झाले. त्यात नंदीग्रामच्या रूपाने पक्षसंघटनेतील विपर्यास व त्यातून निर्माण होणारे तणाव कोणत्या थराला जाऊ शकतात हे दिसले. सिंगूरबद्दल तृणमूल काँग्रेस मुख्यत्वे जबाबदार होती. तरीही त्या उदाहरणातून जमीनधारकाचं हित आणि औद्योगिक विस्तार यांच्यातला तणाव हाताळण्यात डावी आघाडी कशी

अपयशी ठरली ते दिसतं. लालगढच्या निमित्ताने राज्याचा असमतोल विकास आणि राज्यप्रशासनाच्या मर्यादा पुढे आल्या. या तिन्ही गोष्टी एकत्र केल्या तर डाव्या आघाडीला शासनव्यवहाराच्या पातळीवर आलेलं अपयश स्पष्ट होतं.

**ममतांचं राजकारण**

म्हणून मग, डावी आघाडी पराभूत व्हावी म्हणून गणपती पाण्यात ठेवून बसलेल्यांप्रमाणे सर्व आशा ममतांच्या पक्षावर केंद्रित करायच्या का हा प्रश्नही बिकट आहे. ममता बॅनर्जी यांनी कम्युनिस्टांना पर्याय म्हणून स्वतःची प्रतिमाण उभी करण्यात यश मिळवलं आहे. दीर्घकाळ धाडसाने आणि चिकाटीने कम्युनिस्ट ताकदीच्या विरोधात त्या उभ्या राहिल्या आहेत. 'सामान्य माणूस' हा त्यांच्या कम्युनिस्टविरोधी राजकारणाचा आधार असून त्यांनी स्वतःभोवती 'प्रस्थापितांविरोधा'चं वलय निर्माण केलं आहे. प. बंगालमध्ये कम्युनिस्टांना प्रतिकार करण्यासाठी त्यांनी जसं भाजपला हाताशी धरलं तसंच त्या नक्षलवाद्यांनाही हाताशी धरतात असं कधीमधी दबकत दबकत बोललं जातं. याचाच अर्थ, त्यांचं राजकारण सरळसोट, एकखांबी आणि कम्युनिस्ट विरोधाच्या एकमेव कलमावर आधारित असून त्यांच्याभोवती सर्वप्रकारचे कम्युनिस्ट विरोधक गोळा होतात.

> ■■
> **ममता बॅनर्जी व कम्युनिस्टांमधील लढा हा 'फसलेली जनाभिमुखता' आणि 'लोकानुरंजनी राजकारण' यांच्यातल्या लढा ठरणार अशी चिन्हे दिसत आहेत.**
> ■■

पण त्यांची स्वतःची/त्यांच्या पक्षाची विकासाबद्दलची राजकीय भूमिका संदिग्ध राहिली आहे. देशभर वेळोवेळी राज्या-राज्यांमध्ये जे वेगवेगळे लोकानुरंजनवादी (पॉप्युलिस्ट) नेते उदयाला आले त्यांच्यामध्ये ममतांची गणना करावी लागेल. अशा लोकानुनयी किंवा लोकरंजनवादी राजकारणात स्पष्ट भूमिकेचा अभाव असतो; ते डाव्या आणि बिगरडाव्या भूमिकांमध्ये हेलकावत राहते; लोककल्याणकारी धोरणाचे मोठे दावे आणि भावनिक आवाहने ही अशा राजकारणात मध्यवर्ती असतात; लोकानुनयी आणि भाषणबाज (डेमॅगॉजिक) नेतृत्वावर अतिरिक्त भर देऊन लोकोत्तर प्रतिमा रचण्यावर या राजकारणाचा भर असतो आणि त्या-त्या राज्यातल्या प्रस्थापितांविरोधात उभे राहून लोकांना आकर्षित करण्यात येणारे यश हे अशा राजकारणाचे एक इंगित असते (म्हणून त्याची सुरुवात शहरांपासून होते).

आज ममता बॅनर्जींनी पश्चिम बंगालमध्ये निःसंशयपणे कम्युनिस्टांपुढे आव्हान उभे केले आहे. पण हा लढा 'फसलेली जनाभिमुखता' आणि 'लोकानुरंजनी राजकारण' यांच्यातल्या लढा ठरणार अशी चिन्हे दिसत आहेत.

अर्थातच ही सर्व चर्चा पश्चिम बंगालच्या बाहेर, एकूण भारतीय राजकारणाच्या मुद्द्याशीही जोडणे गरजेचे आहे. त्यासाठी डाव्या आघाडीच्या मूल्यमापना-बरोबरच माकपचे मूल्यमापनही करायला हवे.

**डाव्यांच्या पीछेहाटीचा अर्थ**

डावी आघाडी प. बंगालमध्ये सत्तेवर आली तो क्षण काँग्रेसच्या पाडावाचा होता. जरी काँग्रेसची खरी पडझड १९८९ नंतरच झाली असली तरी या पाडावाचा आरंभ १९७७ पासून (म्हणजे १९७५ च्या आणीबाणीच्या घोषणेपासूनच) झाला. आणि आज जेव्हा (कदाचित) काँग्रेसच्या पुनरूज्जीवनाची सुरुवात झाली आहे त्या टप्प्यावर कम्युनिस्टांची पीछेहाट होताना दिसते. आजच्या कालखंडात अशी पीछेहाट होणं एका परीने स्वाभाविक (पण राजकीय पर्यायांच्या दृष्टीने अनिष्ट) आहे.

स्वाभाविक अशासाठी की आपलं पुनरूज्जीवन घडवताना काँग्रेसने स्वतःमध्ये आणि एकूण भारतीय राज्यसंस्थेच्या भूमिकेमध्ये गंभीर असे बदल घडवले आहेत. पूर्वीच्या 'डाव्या-उजव्या' भाषेत बोलायचं तर आपलं संपूर्ण राजकारण उजव्या ध्रुवाकडे म्हणजे जागतिक भांडवलशाहीकडे झुकलं आहे. अशा चौकटीत डाव्याची पीछेहाट अंतर्भूतच आहे. मात्र त्यातच धोकासुद्धा आहे.

(पृ. २५ वर पुढे पहा)

शकतो.

गेल्या काही वर्षांपासून केरळ आणि पश्चिम बंगाल सरकारांनी विकास आणि औद्योगिकीकरणाच्या नावाखाली नवउदारमतवादी आर्थिक धोरणे पुढे रेटली. ही प्रक्रिया विरोधभासात्मक आहे. केंद्र सरकारच्या पातळीवर डावे पक्ष नवउदारमतवादी धोरणांच्या स्वीकारण्याला सातत्याने विरोद करीत राहिले. मात्र आपल्या राज्यात याच धोरणांचा त्यांनी सातत्याने असंवेदनशील व आक्रमक स्वरूपात पाठपुरावा केला. या दोन राज्यातील डाव्यांचा पाडाव हा त्यांच्या दुतोंडीपणा व दांभिकतेला जनतेने दिलेला नकार आहे. पक्षाची वैचारिक भूमिका आणि व्यावहारिक मर्यादा या पेचातून डाव्यांपुढे संकट उभे राहिले आहे. केंद्रात डाव्यांच्या दबावातून काँग्रेसला अनुकूल ठरलेला लोकानुरंजनवादी बदल डाव्यांना स्वतःसाठी त्यांच्यात राज्यात अनुकूल करता आलेला नाही. शासकीय व प्रशासकीय पातळीवर पक्ष जनकल्याण, दारिद्र्य निर्मूलन, मुक्तिदायी समाज, 'नाही रे'च्या हिताचा कारभार करणारा पक्ष राहिला नाही. राज्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या १०० दिवसांची अंमलबजावणी न केल्याबद्दल बंगालमधील डाव्या सरकारविरोधात पश्चिम बंग खेत मजूर समिती या शेतकरी संघटनेने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. सार्वजनिक सेवांचे खाजगीकरण, भांडवली गुंतवणुकीपढे शरणागती, अल्पसंख्यांकांबद्दल असंवेदनशीलता आणि दुर्लक्ष, राज्यसत्तेचा दमनकारी वापर यामुळे त्रासलेली जनता पर्यायाच्या शोधात आहे, असेच तर या निकालावरून सूतोवाच होत नसावे?

■

राजकारणातली गडबड... पृ. १९ वरून

काँग्रेसला आणि एकूणच आपल्या राजकारणाच्या उजव्या भूमिकेला काही स्पीडब्रेकर्सची आणि पर्यायी वळणांची, तसेच डावीकडे रेटणाऱ्या शक्तींची आज नितांत गरज आहे. कम्युनिस्टांच्या पीछेहाटीचा अर्थ असा की राजकारणाची मध्यभूमी जनाभिमुख आणि लोककल्याणकेंद्री व्हावी यासाठीचा रेटा भारताच्या राजकारणात शिल्लक राहणार नाही.

पश्चिम बंगालमध्ये जर येत्या काळात कम्युनिस्ट पक्ष चारी मुंड्या चीत झाला तर तो फक्त एका फसलेल्या जनवादी राजकारणाचा पराभव नसेल तर एकूण जनवादी पर्यायांच्या अभावाचेही ते निदर्शक असेल. या स्थितीला अर्थातच, कम्युनिस्ट पक्ष स्वतःसुद्धा जबाबदार असेलच. तीन दशकांहून अधिक काळ सत्तेवर राहूनही बंगालने भारताच्या राजकारणापुढे किंवा अर्थकारणापुढे कोणताही वारसा मागे ठेवलेला नाही, राज्यकारभाराचे खास डावे प्रारूप उभे केलेले नाही किंवा कम्युनिस्ट पक्षाला व पुरोगामी राजकारणाला काही खास ताकद मिळवून दिलेली नाही ही पश्चिम बंगालच्या डाव्या आघाडीच्या कारकिर्दीची खरी शोकांतिका आहे.

राष्ट्रीय पातळीवर याच काळात स्वतःकडे पुढारपण घेणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाची काय भूमिका राहिली आहे ? आणीबाणीनंतर काँग्रेसविरोधात उभ्या राहणाऱ्या कम्युनिस्टांनी १९८९ मध्ये त्याच काँग्रेसविरोधाखातर राष्ट्रीय आघाडीला भाजपच्या बरोबरीने बाहेरून पाठिंबा दिला. त्यानंतर देशाचा कारभार चालवण्याची जबाबदारी स्वीकारण्याची संधी आली तेव्हा ती संधी राबवण्यात अंगचोरपणा केला आणि सरतेशेवटी काँग्रेसच्या (यूपीए) सरकारच्या काळात सहकार्य आणि विरोध दोन्ही करण्याची संधी आली ती आपल्या वैचारिक-नैतिक श्रेष्ठत्वाच्या अहंकारापायी घालवली.

वर म्हटल्याप्रमाणे नव्या काँग्रेस पक्षावर अंकुश ठेवण्याची आज गरज आहे. भाजपच्या वाताहतीनंतर काँग्रेस पक्षाला राजकीय विरोधाचा धाक राहिलेला नाही. अशा टप्प्यावर २००४ ते २००८ या कालखंडाप्रमाणे कम्युनिस्ट पक्ष नव्या यूपीए सरकारच्या धोरणांमध्ये विधायक हस्तक्षेप करू शकला असता. त्याऐवजी आज कम्युनिस्ट पक्ष केरळ आणि पश्चिम बंगालची सरकारं वाचवण्याच्या धडपडीत अडकून पडला आहे.

■